महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA
# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सिंधुदुर्ग
## Government Medical College, Sindhudurg
Website – www.gmcsindhudurg.com Phone no - 02362/ 228377 Email - deangmcsindhudurg@gmail.com
Add – A/P Oros Sindhudurg Nagari, Tal – Kudal, Dist – Sindhudurg, Pin Code - 416812

जा.क्र.शावैमसिं/आस्था १-३/अभ्यागत अध्यापक/जाहिरात/2906-11/२०२६ दिनांक- 15 /०५/२०२६

## जाहिरात

विषय :- ३६४ दिवसांकरिता निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात "अभ्यागत अध्यापक" (Visiting Faculty) निवड समितीमार्फत भरणेबाबत.

संदर्भ :- शासन निर्णय क्रमांक MEDD-१२/२६/२०२६-MMD(Vais-२)१५७४७९१ दि. १३ मार्च २०२६.

उपरोक्त विषयांकित संदर्भीय शासन निर्णयाच्या अनुषंगाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सिंधुदुर्ग संस्थेतील संस्थास्तरावरील निवड समितीमार्फत मानधन तत्वावर अभ्यागत अध्यापक निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात शासनाच्या प्रचलित नियमानुसार अनुज्ञेय असलेल्या मानधन व गुणवत्तेनुसार भरण्याकरिता पात्र उमेदवारांकडून खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | उमेदवारांनी अर्ज सादर करावयाचा कालावधी | दि. १८/०५/२०२६ ते २९/०५/२०२६ सकाळी ११.०० ते सायं. ०५.०० वाजेपर्यंत ( सुटटीचे दिवस वगळून) |
| २) | मुलाखतीचा दिनांक | दि.०३/०६ /२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता |
| ३) | मुलाखतीचे ठिकाण | अधिष्ठाता यांचे दालन, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सिंधुदुर्ग |

इच्छूक उमेदवारांनी या कार्यालयाच्या संकेतस्थळावर (www.gmcsindhudurg.com) तसेच जाहिरातीसोबत जोडलेल्या विहित नमुन्यातील अर्ज उपलब्ध (download) करून घ्यावा. तसेच सदरील अर्ज परिपूर्ण भरून त्यासोबत आवश्यक ते सर्व शैक्षणिक अर्हतेचे कागदपत्र/ प्रमाणपत्राच्या छायांकित साक्षांकित प्रती जोडाव्यात. (जाहिरातीतील अटी व शर्ती क्र. १२ व विहीत नमुन्यातील अर्जात नमुद केल्याप्रमाणे) उमेदवारांनी कार्यालयातील आवक जावक शाखेस प्रत्यक्ष अथवा पंजीकृत डाकेने सादर करावा व त्याबाबतची पोच घ्यावी. उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज सादर करु नये. ऑनलाईन अर्ज स्विकारला जाणार नाही. मुलाखतीच्या वेळी उमेदवारांनी मूळ प्रमाणपत्रांसोबत व साक्षांकित केलेल्या प्रतींसह थेट मुलाखतीच्या ठिकाणी स्वखर्चाने हजर रहावे. मुलाखतीस उपस्थित न राहिल्यास उमेदवाराचा अभ्यागत अध्यापक नियुक्तीकरीता विचार करण्यात येणार नाही.

संस्थेतील अभ्यागत अध्यापक ३६४ दिवसांकरीता निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात भरावयाच्या पदांची माहि... खालीलप्रमाणे

*Required Educational Qualification As per N.M.C. Norms.

**संवर्ग:- अभ्यागत अध्यापक**

**पात्रता**

१. कोणत्याही वैद्यकीय विषयाची पदव्युत्तर पदवी (MD/MS/DNB/DM/MCH) अथवा MSc with PHD (Anatomy, Physiology, Biochemistry, Pharmacology and Microbiology विषयांकरीता)

- Those candidates to have undergone DNB Training in a multi speciality teaching hospital with at least ५०० beds, involved in various post graduate/super-speciality teaching programmes provided that the one out of three DNB supervisors (teachers) qualify as post graduate teacher as per MCI norms in his/her previous appointment and one out of remaining two should qualify as post graduate teacher as per MCI regulations with the following bed requirement for teaching unit: (As per The Gazette of India Extraordinary Part-III-Section ४ New Delhi, Thursday,November १ २०१८/ Kartika १०, १९४० Dt. ३१.१०.२०१८)

२. पदव्युत्तर पदवीनंतर संबंधित विषयातील किमान ८ वर्षाचा कामाचा अनुभव
उमेदवारांची कागदपत्रे परिपुर्ण नसल्यास अर्जाचा विचार केला जाणार नाही. वरील पदांकरीता नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपात ३६४ दिवसांकरीता असून, कोणतीही पुर्वसूचना न देता तात्पुरती अभ्यागत सेवा समाप्त करण्यात येईल.

अटी व शर्ती

१. अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरीत्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.
२. सदर पदाकरीता दरमहा मानधन प्रति सत्र रु. १०००/- (अक्षरी एक हजार फक्त) व कमाल मासिक मानधन रु. २४०००/- (अक्षरी चोवीस हजार फक्त) सदरील वेतन संस्थेतील स्वीय प्रपंजी खात्यातून भागविण्यात येईल. तसेच मानधनाव्यतिरिक्त अन्य कोणतेही भत्ते लागू राहणार नाहीत.
३. वयोमर्यादा:- उमेदवाराचे वय ७० वर्षापेक्षा अधिक असणार नाही.
४. गुणवत्ता यादी ही उपरोक्त नमुद केलेल्या शैक्षणिक अर्हतेनुसार प्रापत परिक्षेच्या गुणांवर ठरविण्यात येईल. तसेच सहाय्यक प्राध्यापक/ सहयोगी प्राध्यापक/ प्राध्यापक या पदाचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.
५. पदसंख्या कमी जास्त करण्याचे अधिकार अधिष्ठात यांनी राखून ठेवलेले आहेत.
६. उमेदवार या महाविद्यालयाव्यतिरिक्त इतर संस्थेत कार्यरत असल्यास संस्थाप्रमुखांचे "ना हरकत प्रमाणपत्र" अर्जासोबत जोडावे व त्याठिकाणी राष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषदेच्या निरिक्षणात सहभाग नोंदविला किंवा कसे? असल्यास केव्हा? (तारीख नमुद करावी) व तसेच अर्जासोबत जोडावे.
७. ज्या उमेदवारांची निवड करण्यात आली असेल व ते कार्यरत असताना सतत जास्त कालावधीपर्यंत गैरहजर अयल्यास किंवा त्यांचे काम समाधानकारक नसल्यास त्यांची अभ्यागत नियुक्ती तात्काळ समाप्त करण्यात येईल.
८. सदर पदांकरिता उमेदवारांची नियुक्ती निव्ळ ३६४ दिवसांसाठी अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर राहील. ३६४ दिवसांनंतर कामगिरी मुल्यमापनानंतर तांत्रिक खंड देउन पुन्हा ३६४ दिवसांसाठी सेवावाढ देता येईल. तसेच २ वर्षानंतर निवड प्रक्रियेद्वारे पुनर्नियुक्ती देता येईल.
९. अर्जासोबत प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती साक्षांकित करून जोडणे आवश्यक आहे, अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही. नंतर कोणतीही कागदपत्रे स्विकारली जाणार नाहीत.

१०. सदर नियुक्ती ही अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात असल्यामुळे आपणास या पदावर कायमस्वरूपाचे कोणतेही हक्क राहणार नाहीत व कायम नियुक्तीचे कोणतेही फायदे अनुज्ञेय राहणार नाहीत.

११. (अ) प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष एमबीबीएस तसेच एमडी, एम.एस.डी.एम., एम.सी.एच. किंवा समतुल्य या सर्व परीक्षेची गुणपत्रिका नसल्यास परीक्ष पॉइंट, ग्रेड प्रमाणपत्र. (ब) सर्व पदवी, पदविका व पदव्युत्र पदवी परीक्षेची डिग्री प्रमाणपत्रे व अंतिम वर्षाची गुणपत्रिका. (क) एमएमसी किंवा एमसीआय नुतनीकरण केलेली नोंदणी प्रमाणपत्र. (ड) जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र व आवश्यक असल्यास नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्र. (ई) जन्म दाखला / शाळा/ महाविद्यालय सोडण्याचा दाखला. (फ) पॅनकार्ड व आधारकार्डची छायाप्रत, शोधनिबंध (Research Paper) इ. कागदपत्रे / प्रमाणपत्राचा एक छायांकित संच अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील. उक्त रिक्त असलेल्या पदाकरिता नियुक्ती संबंधात यापुर्वी ज्यांनी अर्ज / निवेदने सादर केली आहेत. त्यांनी नव्याने विहीत नमुन्यात अर्ज सादर करणे आवश्यक आहे. यापुर्वी सादर केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

टिप: अभ्यागत अध्यापक या पदासाठीच्या विस्तृत माहितीसाठी कृपया राष्ट्रीय वैद्यक आयोगाने दि. १४.०८.२०२१ रोजी प्रसिद्ध केलेल्या प्रारूप मार्गदर्शक सुचनांचा अवलोकन करण्यात यावा. (ऑनलाइन उपलब्ध आहे) तसेच राष्ट्रीय वैद्यक आयोगाने वेळोवेळी प्रसिद्ध केलेल्या Teacher Eligibility Criteria चे अवलोकन करावे.

15.05.2026

डॉ.अनंत डवंगे,
अधिष्ठाता,
शासकिय वैद्यकिय महाविदयालय, सिंधुदुर्ग

प्रति -

१. उपरोक्त संबंधित सर्व विषयातील प्राध्यापक व विभागप्रमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सिंधुदुर्ग.
२. वैद्यकीय अधिक्षक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, सिंधुदुर्ग.
३. सूचना फलक:- अधिष्ठाता कार्यालय, विद्यार्थी विभाग, बाह्यरूग्ण विभाग, मुलांचे व मुलींचे वसतीगृह, मध्यवर्ती ग्रंथालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सिंधुदुर्ग.
४. सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.

प्रत माहितीस्तव -

१. मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण संशोधन व आयुष विभाग, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

प्रत कार्यवाहीस्तव
श्री. विलास राणे, उच्चश्रेणी लघुलेखक, शा. वै. म, सिंधुदुर्ग
यां - सदरची जाहिरात दि. / / 2026 रोजी महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करावी.

# (अभ्यागत अध्यापक) (Visiting faculty) पदाकरीता अर्ज

प्रति,

मा. अधिष्ठाता,

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,

सिंधुदुर्ग

विषय:- ____________________________ विषयातील ३६४ दिवसांकरीता अभ्यागत अध्यापक या पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपातील अर्ज सादर करणेबाबत.

१. उमेदवाराचे संपूर्ण नाव:-

२. उमेदवाराचा कायमचा पत्ता:-

३. शैक्षणिक अर्हता:- पदवी/पदव्युत्तर पदवी (MD/MS/DNB/DM/MCH/ MSc with PHD) पास केल्याचे दिनांक:-

४. पदवी /पदव्युत्तर पदवी (MD/MS/DNB/DM/MCH/ MSc with PHD) उत्तीर्ण केलेल्या विद्यापिठाचे नाव:-

५. अभ्यागत अध्यापक या पदाकरीता जाहिरातीमध्ये नमुद केल्याप्रगमाणे शैक्षणिक अर्हता व अनुभव बंधनकारक राहील. (त्याबाबतचे आवश्यक कागदपत्रे सोबत जोडण्यात यावी.)

६. जन्मदिनांक (अंकात) :-________________ अक्षरात:- ________________________

७. अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक म्हणजे दिनांक /०५/२०२६ रोजीचे वय____वर्ष____महिने___ दिवस____

८. आधार कार्ड क्र.

९. मोबाईल क्र. ________________ई-मेल आयडी ___________________

१०. अर्जदाराची शैक्षणिक पात्रता:-

| शैक्षणिक अर्हता | विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | एकुण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

११. शासकीय नोकरीतून सेवानिवृत्त झालेल्या अध्यापकांनी त्याबाबतची माहिती खालील तक्त्यात सादर करावी तसेच अनुभव प्रमाणपत्र जोडण्यात यावे.

| अ.क्र. | शासकीय संस्थेचे नाव | पदनाम | अनुभव | सेवानिवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१२. इतर अध्यापक/उमेदवार यांनी संबंधित पदाबाबतचा स्वत: चा अनुभवाचा तपशिल खालीलप्रमाणे देण्यात यावा. (सोबत प्रमाणपत्र जोडावे.)

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | पद | रुजू झाल्याचा दिनांक | एकुण अनुभव | कामाचे स्वरुप (नियमित/ तात्पुरते) |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

१३. अभ्यासक्रमाचे नाव (Basic Course) सोबत प्रमाणपत्र जोडावे.

मेडिकल एज्युकेशन टेक्नॉलॉजी- होय/ नाही II) बायोमेडिकल रिसर्च- होय/ नाही

१४. शोधनिबंधाबाबत माहिती जाहिरातीप्रमाणे (NMC च्या मानकानुसार) (शोधनिबंधाच्या प्रती जोडणे आवश्यक आहे)

| No. | Publication type National / International | Publication year and publication No. | Author type | Article Index Yes/ No | If indexed which index | Post Held |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

१५. अर्जासोबत जोडलेले प्रमाणपत्रे

| अ.क्र. | प्रमाणपत्रे | अ.क्र. | प्रमाणपत्रे | अ.क्र. | प्रमाणपत्रे |
|---|---|---|---|---|---|
| १ | | ७ | | १३ | |
| २ | | ८ | | १४ | |
| ३ | | ९ | | १५ | |
| ४ | | १० | | १६ | |
| ५ | | ११ | | १७ | |
| ६ | | १२ | | १८ | |

DECLARATION (प्रतिज्ञापत्र)

_________पदाकरीता

मी डॉ. ________________________________ प्रमाणित करतो/ करते की, वर नमुद केलेला तपशिल माझ्या माहिती प्रमाणे सत्य व अचूक आहे. मी प्रमाणित करतो/करते की, अर्जात नमुद केलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळुन आल्यास अर्ज अपात्र करणेस, नोकरी गमविण्यास व त्या अनुषंगाने होणाऱ्या कारवाईस पात्र राहिल. तसेच सदर पदावरील नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपातील निव्वळ मानधन तत्वावर असल्याने शासन सेवेत कायम करण्यासाठी हक्क राहणार नाही, याची मला पूर्णपणे जाणीव असून शासन सेवेत कायम करण्यासाठी भविष्यात हक्क सांगणार नाही, अशी लेखी हमी देत आहे.

स्थळ: अर्जदाराची स्वाक्षरी

दिनांक: (अर्जदाराचे संपूर्ण नाव_______________________)

# अर्जासोबत जोडावयाच्या आवश्यक कागदपत्रांची सूची

| क्र | आवश्यक कागदपत्रांची सूची | सोबत जोडले आहे | सोबत जोडले नाही |
|---|---|---|---|
| १ | एमबीबीएस पदवी गुणपत्रिका ( पूर्ण वर्षाची) | | |
| २ | एमबीबीएस पदवी प्रयत्न ( Attempt) प्रमाणपत्र | | |
| ३ | एमबीबीएस पदवी उत्तीर्ण प्रमाणपत्र | | |
| ४ | एमबीबीएस MMC/MCI Rejistration and Renewal Certificate | | |
| ५ | एमबीबीएस पदवी प्रमाणपत्र | | |
| ६ | पदव्युत्तर पदवी गुणपत्रिका | | |
| ७ | पदव्युत्तर पदवी प्रयत्न ( Attempt) प्रमाणपत्र | | |
| ८ | पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण प्रमाणपत्र | | |
| ९ | पदव्युत्तर पदवी MMC/MCI Rejistration and Renewal Certificate | | |
| १० | पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्र | | |
| ११ | वरिष्ठ निवासी पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र (१ वर्ष) (1 year SR Ship) | | |
| १२ | अभ्यासक्रमाचे नाव ( Basic Course) सोबत प्रमाणपत्र जोडावे | | |
| | मेडिल एज्युकेशन टेक्नोलॉजी - होय/ नाही | | |
| | बायोमेडिकल रिसर्च - होय /नाही | | |
| | Publications National / international | | |
| १३ | अनुभव प्रमाणपत्र( जाहीराती प्रमाणे) | | |
| १४ | वयाचा पुरावा ( जन्म दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, दहावी प्रमाणपत्र) इ. | | |
| १५ | जात प्रमाणपत्र | | |
| १६ | जातवैधता प्रमाणपत्र | | |
| १७ | वैध नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र दि. ३१/०३/२०२६ पर्यंत वैध | | |
| १८ | अधिवास प्रमाणपत्र | | |
| १९ | आधार कार्ड | | |
| २० | पॅन कार्ड | | |
| २१ | बंधपत्रित उमेदवार होय / नाही | | |
| २२ | इतर | | |

( टिप : उपरोक्त नमुद केलेले अ. १ ते २२ चे सर्व कागदपत्रे ( दस्तऐवज) साक्षांकित करून वरिल अनुक्रमाने द्विप्रतीत अर्जासोबत जोडण्यात येत आहे.

उमेदवाराची स्वाक्षरी